# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - *dy.registrar.tau@fort.mu.ac.in*

**Teaching Appointments & Approval Section**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

परिपत्रक क्र. टीएएस/ ०८/२०१८-२०१९ दिनांक : २३/०७/२०१८

**विषय : आश्वासित प्रगती योजनेचे (CAS) प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करणेबाबत.**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था,
मुंबई विद्यापीठ.

संदर्भ:- १) परिपत्रक क्र. टीएएस/०२/२०१८-२०१९ दिनांक २४/०४/२०१८.
२) परिपत्रक क्र. टीएएस/०५/२०१८-२०१९ दिनांक १९/०५/२०१८.
३) परिपत्रक क्र. टीएएस/०६/२०१८-२०१९ दिनांक ३१/०५/२०१८.

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकांच्या अनुषंगाने शिक्षकांच्या आश्वासित प्रगती योजने (CAS) बाबतचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात यावे, असे कळविण्यात आले होते. मला प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की सदर अर्ज आता अविरतपणे स्विकारण्यात येतील. त्यासाठी आपल्या महाविद्यालयातील आश्वासित प्रगती योजने (CAS) संदर्भातील (स्टेज-१ ते स्टेज-२, स्टेज-२ ते स्टेज-३, स्टेज-३ ते स्टेज-४) पात्र शिक्षकांचे प्रस्ताव मागवून महाविद्यालयीन IQAC मार्फत API सह सर्व कागदपत्रे तपासून संपूर्णपणे पात्र असलेल्या शिक्षकांचे प्रस्ताव आपापल्या महाविद्यालयात स्विकारावेत. तसेच ज्या महाविद्यालयातील आश्वासित प्रगती योजने (CAS) संदर्भातील स्टेज—४ ते स्टेज—५ साठी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रस्तावित केलेल्या नियमांनुसार व महाराष्ट्र शासन निर्णयांनुसार प्राध्यापक (Professor) स्टेज—४ ते स्टेज—५ हया पदासाठी सह—संचालक, उच्च शिक्षण विभागाकडून मान्यता मिळाली आहे अशा महाविद्यालयातील पात्र व इच्छुक सहयोगी प्राध्यापकांचे (Associate Professor) प्रस्ताव मागवून महाविद्यालयीन IQAC मार्फत API सह सर्व कागदपत्रे तपासून संपूर्णपणे पात्र असलेल्या सहयोगी प्राध्यापकांचे प्रस्ताव प्राचार्यांमार्फत विद्यापीठाकडे पाठवावेत. **सदर प्रस्ताव सादर करताना सह—संचालक, उच्च शिक्षण विभागाकडून प्राप्त झालेले पद मान्यतेचे पत्र जोडणे अनिवार्य आहे.** त्या अनुषंगाने पात्र शिक्षकांना महाविद्यालयामार्फत ऑनलाईन प्रक्रियेबाबतचे युजर आयडी व पासवर्ड प्रदान करण्यात यावे, यासाठी http://muonline.org.in या संकेतस्थळावर भेट दयावी व download section मधील guideline for CAS वाचून त्यातील सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

ऑनलाईन अर्ज शिक्षकांनी स्वत: भरावयाचे आहेत. ऑनलाईन पध्दतीने सादर झालेले पात्र शिक्षकांचे अर्ज महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी संकेतस्थळावर पुन्हा एकदा तपासून खात्री करून घ्यावी व तद्नंतर विद्यापीठास ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत. या प्रस्तावांची प्रिन्ट आऊट घेऊन स्वत:जवळ ठेवावी व विद्यापीठाच्या पुढील परिपत्रकात दिलेल्या शिबिराच्या वेळापत्रकानुसार व सुचनांनुसार कार्यवाही करावी. **ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्यासाठी रूपये ४,९००/- प्रक्रिया शुल्क प्रती उमेदवार आकारण्यात येईल.** आश्वासित प्रगती योजना (CAS) ची संपूर्ण प्रक्रिया जसे अर्ज स्विकृती, प्रक्रिया शुल्काचा भरणा, शिक्षक मान्यता पत्रे, इत्यादी यापुढे फक्त ऑनलाईन पध्दतीने करावयाचे असल्याने शिक्षकांना ऑनलाईन प्रक्रियेद्वारे अर्ज करणे आवश्यक आहे. यापुढे **ऑफलाईन पध्दतीने अर्ज स्विकारले जाणार नाहीत** याची कृपया नोंद घ्यावी. विहित केलेले प्रक्रिया शुल्क विना-परतावा (Non-refundable) अहस्तांतरणीय (Non-transferable) असल्यामुळे शिक्षकांनी आपण आश्वासित प्रगती योजनेच्या (CAS) संबंधित टप्प्यासाठी पात्र आहोत याची खात्री करूनच ऑनलाईन नोंदणी करावी.

ऑनलाईन नोंदणीसाठी विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील **link** अविरतपणे सुरू राहील. पात्र शिक्षकांनी आश्वासित प्रगती योजनेच्या सर्व **guidelines** चे व्यवस्थितरीत्या वाचन करून मगच आपला अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावा.

ऑनलाईन शिक्षक नियुक्ती व मान्यता व आश्वासित प्रगती योजने ;बौद्ध बाबत मदतीसाठी संकेतस्थळावरील **"Contact Us"** टॅब मध्ये **Helpline No. ( 077220 65283, 077220 65284 )** व ईमेल **support@muonline.org.in** देण्यात आले आहेत, त्यांची मदत घ्यावी. कृपया सदर परिपत्रकास महाविद्यालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करावे तसेच याबाबत सर्व शिक्षकांना अवगत करण्यात यावे.

दत्ता घुगे

**( दत्ता घुगे )**

**उपकुलसचिव-टीएएएस**